# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २३/०७/२०२४ (मंगळवार) सकाळ**

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. खापरखेडा :— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे अप. क्र. १९२/२२ कलम ३७६(अ, ब), ३७६(२) (जे) (के) ३६३, ५०६ भादंवि सहकलम ४, ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दि. ०६/०४/२०२२ चे २२.३० वा. दरम्यान फिर्यादी व **आरोपी नामे— सुनिल उर्फ मोटु ध्यानलाल धुर्वे, वय २६ वर्षे रा. वलनी तट्टा लाईन वार्ड नं. ३ ता. सावनेर** हे एकाच गावात घराशेजारी राहत असुन यातील फिर्यादीच्या अल्पवयीन पिडीत मुलगी ही आरोपीच्या घरी टी. व्ही. पाहण्याकरीता गेली असता आरोपीने पिडीत मुलीला घराकडील मागच्या शेतातील जंगलात घेवुन जावुन पिडीतासोबत जबरीने शारिरीक संबंध केले व घरी कुणालाही सांगीतल्यास घरच्या सर्वांचा मर्डर करील अशी धमकी दिली.

सदर प्रकरणाचे तपास मपोउपनि पल्लवी काकडे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश जैस्वाल सा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिनांक २३/०७/२०२४ रोजी मा. अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश जैस्वाल सा. यांनी वरील नमुद आरोपीला सदर गुन्हयात १) कलम ४ पोक्सो मध्ये २० वर्षे सश्रम कारावास व २०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०१ वर्षे सश्रम कारावास २) कलम ८ पोक्सो मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास व ५००/रू दंड. दंड न भरल्यास ०५ महिने साधा कारावास ३) सदर गुन्हयात कलम ३६३ भादवि मध्ये ०५ वर्षे सश्रम कारावास व ५००/रू दंड. दंड न भरल्यास ०५ महिने साधा कारावास ४) सदर गुन्हयात कलम ५०६ भादंवि मध्ये ०२ वर्षे सश्रम कारावास व २००/रू दंड. दंड न भरल्यास ०२ महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी खापर्डे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा सचिन चौधरी पोस्टे खापरखेडा यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर